# डेटामेल - अमर्याद जागा (अनलिमिटेड स्टोरेज) देणारं एकमेव ईमेल ॲप्लिकेशन

**पुणे** : जगातील पहिलं भाषिक ईमेल ॲप्लिकेशन असलेल्या डेटामेलने आपल्या ॲप्लिकेशनवर अमर्याद जागा (स्टोरेज) उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. हे जगातील एकमेव ॲप्लिकेशन आहे जे अमर्याद स्टोरेजची सुविधा देतं. डेटामेल ईमेल सेवा डेटा एक्सजेन टेक्नॉलॉजीज ह्या कंपनीने विकसित केलं आहे.

डेटा एक्सजेन टेक्नॉलॉजीजचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी असलेले डॉ.अजय दाता ह्यांनी सांगितलं, खाजगी आणि व्यावसायिक संवाद साधण्यासाठी ईमेल हे अतिशय महत्वाचं साधन आहे. त्यामध्ये महत्वाची माहिती असते जी जास्त काळासाठी आंणि सातत्य (कंटिन्यूटी) राखण्यासाठी आवश्यक असते. पण कधीतरी स्टोरेज नसल्याने किंवा मेलबॉक्स पूर्ण भरल्यामुळे काम थांबू शकतं. अश्या परिस्थितीत युजर्सना काही मेल्स काढून (डिलीट) टाकावे लागतात किंवा मेल्स आणि डेटा हरवू नये म्हणून त्याचे वेगवेगळे बॅकअप्स बनवावे लागतात.

डेटामेलने ही समस्या ओळखून त्यांनी त्यांच्या युजर्ससाठी ॲप्लिकेशनमध्ये अमर्याद स्टोरेज दिलं आहे. डेटामेलमधील ही सुविधा वापरून युजर्स त्यांच्या कोटा गरज आणि इच्छेनुसार वाढवू शकतात. ॲपमधील वरील कोपऱ्यात एक 'गिफ्ट बॉक्स' आहे. युजर्सनी त्यावर क्लिक केल्यानंतर त्यामध्ये सांगितलेली काही विशिष्ट गोष्ट करावी लागेल. ते केल्यानंतर त्यांच्या ईमेल अकाउंटमध्ये १ चड जागा वाढवली जाईल. ही गोष्ट युजर्स त्यांना पाहिजे तितक्या वेळेस करू शकतात.

असं केल्यामुळे कमी स्टोरेज असल्याने ईमेल बाउन्स होण्यासारख्या समस्या उद्भवत नाहीत आणि युजर्स मुक्तपणे त्यांच्या ईमेलद्वारे संवाद साधू शकतात.